# पुस्तक परिचय

## श्री गुरुस्तुती :- संपूर्ण अर्थ आणि विवेचन

श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज विरचित " श्री गुरुस्तुती " या स्तोत्रावर त्याचा संपूर्ण अर्थ सांगून त्यावर विवेचन करणारे पुस्तक, परमपूज्य श्री बापट गुरुजी यांनी केलेल्या प्रवचनांवर आधारित आहे. मूळ स्तोत्र १० श्लोकांचे आहे.

सन १९०४ साली तुकाराम नावाच्या एका दत्तभक्ताने श्री दत्तात्रेयांचे सगुण दर्शन पाहिजे म्हणून गाणगापूरला एके ठिकाणी राहून केवळ फलाहार घेऊन निर्वाणीचे तप केले आणि फलस्वरुप त्याला स्वामी महाराजांच्या सगुण देहात श्री दत्तात्रेयांचे दर्शन झाले. या चमत्कारपूर्ण घटनेचा उल्लेख या स्तोत्रात आहे.

स्तोत्राचा एकेक श्लोक घेऊन त्यावर " शब्दांच्या पलिकडचे " विवेचन श्री बापट गुरुजींनी केले आहे. या स्तोत्राची फलश्रुति म्हणजे पापविनाश आणि अविद्या, कामना व कर्म या तीनही बंधनांचा अडसर दूर होईल असे स्वामी महाराजांनी सांगितलेले आहे. या स्तोत्राचे जे ध्रुवपद आहे " तो पूर्ण आनंद गुरु समर्थ " याचे विवेचन गुरुजींनी फारच मार्मिकरीत्या केले आहे. स्तोत्रात परमार्थ, सहजपणे समजेल अशा सोप्या शब्दात सांगितला आहे. पुस्तकाच्या शेवटी दिलेली अनुसूचि ही उपयुक्त आहे. संदर्भसूचि वाचून पाहिली तर एकूण २४ ग्रंथांचा गुरुजींनी आधार घेतला आहे.

पारमार्थिक संकल्पना या समजायला अतिशय अवघड आहेत. श्रीमत् भगवत गीतेतील तत्वज्ञान हे शव्दार्थापलिकडचे आहे. ज्ञानेश्वर माऊलींनी विविध उपमा आणि दृष्टान्त देऊन तो अर्थ समजावून सांगितला आहे. याशिवाय लोकमान्य टिळकांनी त्यांच्या गीतारहस्य या ग्रंथात तोच परमार्थ विशद केला आहे. परन्तु त्याहीपेक्षा समर्थ रामदासांनी दासबोधात तो खूपच सुलभ रीतीने सांगितला आहे. तरीसुध्दा परमार्थ शब्दार्थाच्या पलिकडचा आहे आणि प्रत्यक्ष अनुभूती घेतल्याशिवाय त्याचा प्रत्यय येणार नाही. " साखर गोड आहे " या वाक्याचा शब्दार्थ स्पष्ट आहे पण गोड म्हणजे काय? हे साखर प्रत्यक्ष चाखून पाहिल्याखेरीज अनुभवास येणार नाही. (श्रीगुरुस्तुती पृष्ठ २६)

या पुस्तकाचे मला भावलेले एक वैशिष्टय असे की, पारमार्थिक विवेचनात जे शब्द, ज्या उपमा अनेक अनेक वेळा वापरल्या गेल्या आहेत त्या दीर्घकाळ, वारंवार झालेल्या वापरामुळे गुळगुळीत झाल्या आहेत. गुरुजींनी एकदम नवीन उपमा, उदाहरणे आणि दृष्टान्त देऊन परमार्थ स्पष्ट केला आहे. उदा पृष्ठ क्र. ४७, ४८ वर सांगितलेली गुरुकिल्लीची उपमा.

आपण जी काही साधना आयुष्यभर करतो त्याचं फळ वेळीवेळी आपण देवाकडे किंवा सद्गुरुंकडे मागतो. ती इच्छांची छिद्रं असतात. जे काही आपण कमावतो ते या छिद्रातून गमावत असतो. म्हणून चिन्मात्र पदाचे खरे प्राप्तव्य राहूनच जाते. हे सांगण्यासाठी पृष्ठ क्र.१४२-१४३ वर एक मुलगा, सद्गुरु व रिकामी बाटली याचा दिलेला दृष्टान्त अप्रतिम आहे.

एका भिका-याला एका उद्योगपतीने स्वतःची चारचाकी गाडी देऊ केली आणि विचारलं की, ही गाडी घेऊन तू काय करशील? त्यावर भिका-याने " मी गाडीत बसून भीक मागेन " असे उतर दिले . याबाबत परम पूज्य श्री क्षीरसागर महाराज म्हणत असत की, या भक्तांना मी प्रत्यक्ष मोक्षही देऊ शकेन पण ते मागतात मात्र एखादं कुरमु-याचं पोतं. साक्षी भावाविषयी गुरुजींनी जनक राजाचं उदाहरण आणि वेगाने चाललेल्या रेल्वेच्या डब्यामध्ये बसलेल्या व रेल्वे लाईनच्या बाहेर उभे राहणा-या व्यक्तीचे उदाहरण देऊन साध्या शब्दात सहजपणे समजेल असे उत्तम विवेचन केले आहे.

गुरुजींनी सांगितलेले पृष्ठ क्र. ७७ ते ८० वरील " समगती स्पंदन " म्हणजे रेझोनन्स हे तत्त्व एकदम नवीन आहे. अद्वैताचा मार्ग द्वैताकडूनच जातो हे समजावून सांगताना " अद्वैताचे धागे जुळती भक्तीच्या सागरी " या आरतीतल्या पंक्तीचा उल्लेख गुरुजींनी केला आहे. शिष्य आणि सद्‌गुरु हे द्वैत जरी सुरवातीला भासमान होत असले तरी " आपणा सारखे करिती तात्काळ". म्हणजे सद्‌गुरु शिष्याला आपल्या सारखेच बनवितात अर्थात शिष्य आणि सदगुरु हे द्वैत संपून केवळ अद्वैत उरते हे गुरुजींनी सांगितले आहे, पृष्ठ ७९ वर.

या पुस्तकातील उपसंहार लिहितांना " सगुणाचेनी आधारे निर्गुण पाविजे निर्धारे " या समर्थांच्या उक्तीचा उल्लेख गुरुजींनी केला आहे. माझ्या मते हा उपसंहार या संपूर्ण पुस्तकातील परमार्थाचे काढलेले सार आहे. कल्पना स्पष्ट करतांना, (पृष्ठ क्र.१५२) म्हाता-या वाटसरुने डोक्यावरील ओझे घेऊनच रथात बसण्याचा हट्ट धरला. ही उपमा देऊन कर्माचे गाठोडे खाली उतरविल्याशिवाय प्रगती होणार नाही, हे स्पष्ट केले आहे.

श्री गुरुस्तुतीवर इतके यथार्थ व सुंदर स्पष्टीकरण देणारे हे पुस्तक भक्तीमार्गावर वाटचाल करणा-या प्रत्येक साहित्य प्रेमी रसिकाने जरुर वाचावे व संग्रही ठेवावे, अशा योग्यतेचे आहे.

**श्री.व्यं.मराठे, पुणे**

| | |
|---|---|
| पुस्तकाचे नांव :- | श्री गुरुस्तुति : संपूर्ण अर्थ आणि विवेचन |
| लेखक आणि विवेचक :- | परमपूज्य सद्‌गुरु श्री वासुदेव वामन बापट गुरुजी |
| पृष्ठ संख्या :- | १६० |
| पुस्तकाचे मूल्य :- | रु.१७५/- प्रति |
| प्रकाशकाचा पत्ता :- | ओम सद्‌गुरु प्रतिष्ठान<br>ए/८ दौलतनगर, रस्ता नं.७,<br>बोरिवली (पूर्व), मुंबई - ४०० ०६६ |
| संपर्क :- | श्री.ठाकूर , मो.नं. ९८१९४४७९३९ |